ग्रामीण रुग्णालय खुलताबाद, जि. औरंगाबाद येथील दंतशल्य चिकित्सक विभागाची नवनिर्मित २ अस्थाई पदांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः अपदे-२०१८/प्र.क्र.१९/आरोग्य-४

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते. रुग्णालय आवार, मुंबई-४०० ००१.
तारीख: २६ फेब्रुवारी, २०१८.

वाचा

१) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः संकीर्ण-२०१२/प्र.क्र.१३०/आरोग्य-३, दि.२५.०७.२०१२**

२) **शासन आदेश, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः संआसे-२०१७/प्र.क्र.१९९/सेवा-१, दि.१६.०९.२०१७**

३) **संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/सारासे/गट-ब/कक्ष-४/अ.पदे/ग्रा.रु. खुलताबाद/दंशचि/३२-३५/१८, दि.१२.०१.२०१८**

शासन निर्णय

ग्रामीण रुग्णालय खुलताबाद, जि. औरंगाबाद येथील दंतशल्य चिकित्सक विभागाची नवनिर्मित २ अस्थाई पदे संदर्भाधीन क्रमांक १ व २ च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यास मान्यता दिली आहे.

२. ग्रामीण रुग्णालय खुलताबाद, जि. औरंगाबाद येथील दंतशल्य चिकित्सक विभागाची नवनिर्मित २ अस्थाई पदांना खालील अटींच्या अधीन राहून दि.०१.१०.२०१७ ते दि.२८.०२.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

१) उपरोक्त पदांपैकी कोणतेही पद ६ महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त नाही व ज्या कारणांसाठी पदे मंजूर केली आहेत त्या अटी व शर्तीचे पालन करण्यात आले आहे.

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०८.०१.२०१८ नुसार विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे कटाक्षाने पालन करण्यात यावे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे कार्यालयाचा पदविषयक सुधारित आकृतिबंध उच्चस्तरीय समितीकडून अंतिमत: मान्य करुन घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

३) विहीत मुदतीत पदांच्या आढाव्याची कार्यवाही पूर्ण न झाल्यास अस्थायी पदांना त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न मिळाल्यास व त्यामुळे अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतन व भत्ताचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांची राहील.

३. सदर पदांवरील होणारा खर्च, मागणी क्रमांक आर-१ मधील मुख्य लेखाशीर्ष “२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६- सार्वजनिक आरोग्य, ००१-संचालन व प्रशासन, (०१) (०८) प्रा.आ.केंद्राचा सामान्य रुग्णालयाइतका दर्जा वाढविणे (२२१० ०४१३)” या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०८.०१.२०१८ अन्वये प्रशासकीय विभाग प्रमुखांना प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१६१३३१०३९३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.02.26 16:04:41 +05'30'

(प्र.मो.बलकवडे)
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
२. सहसंचालक आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३. उपसंचालक, आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ, औरंगाबाद.
४. महालेखापाल, १/२,महाराष्ट्र (लेखा व लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
५. वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, खुलताबाद.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, खुलताबाद.
७. वित्त विभाग (व्यय-१३, अर्थसंकल्प-१९), मंत्रालय, मुंबई.
८. अवर सचिव (सेवा-२/ सेवा-३/ सेवा-५ /अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती (आरोग्य- ४).

विवरणपत्र

अ. क्र.	प्रथम ज्या शासन निर्णयाने पदे निर्माण झाले त्याचा शासन निर्णय क्र. व दिनांक	पदनाम	पदांची संख्या	ज्या तारखेपासुन पदे पुढे चालु ठेवावायाची आहेत तो दिनांक
१	शा.नि. क्र.संकिर्ण-२०१२/प्र.क्र.१३०/आरोग्य-३, दि.२५.०७.२०१२	दंत शल्यचिकित्सक गट-अ, वर्ग-२	१	१.१०.२०१७ ते २८.०२.२०१८
२		दंतसहाय्यक वर्ग-४	१	
		एकूण	२	